# सेंटर पॉईंट स्कूल टीसीएस क्विझ विजेता



स्पर्धेतील विजेत्या व उपविजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरण करताना मान्यवर

**नागपूर, १३ सप्टेंबर**

देशातील अग्रणी संस्था टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात आयोजित टीसीएस आयटी क्विझ-२०१७ या आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेत सेंटर पाईंट स्कूल, वर्धमान नगरच्या विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकाविले. सेंटर पॉईंट स्कूल, वर्धमान नगरच्या अर्चित वेणूगोपालन व संचित खेडकर या विद्यार्थ्यांनी ही स्पर्धा जिंकली.

इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही नि:शुल्क स्पर्धा आयोजिण्यात आली होती. यंदा या स्पर्धेची संकल्पना ऑटोमेशन, संदर्भ ज्ञान, मशिन शिक्षण आणि चपळता या विषयांवर होती. यावेळी जागतिक स्तरावरील तंत्रज्ञानातील वेगवेगळ्या पैलूंवर या प्रश्नमंजूषेद्वारा प्रकाश टाकण्यात आला. लेखी प्राथमिक फेरीद्वारे प्रादेशिक अंतिम फेरीसाठी सहा संघ निवडण्यात आले होते. यावेळी प्रादेशिक अंतिम फेरीतील विजेते अर्चित वेणूगोपालन व संचित खेडकर या विद्यार्थ्यांना ६० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाऊचर्स, तर उपविजेते ठरलेल्या कृष्णा पब्लिक स्कूल, रायपूरच्या गौरजा ऐरोन व यशराज मिश्रा यांना ४० हजार रुपयांचे गिफ्ट व्हाऊचर्स तसेच स्मृतिचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अंतिम फेरीतील सर्व ६ स्पर्धक चमूंना टीसीएसतर्फे जिम बॅग, ओटीजी, पेनड्राईव्ह, इअरफोन्स व ब्लूटूथ स्पीकर्स असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. याप्रसंगी व्हीएनआयटीचे संचालक डॉ. नरेंद्र चौधरी व टीसीएस नागपूर केंद्राचे प्रमुख अरविंद कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या संघाला एक शिक्षक व पालकांना विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येणार आहे. संचालन गिरी बालसुब्रमण्यम यांनी केले. ही स्पर्धा अहमदाबाद, बंगळुरू, चेन्नई, हैदराबाद, कोलकाता, इंदोर, नागपूर, भुवनेश्वर, कोची, दिल्ली, मुंबई व पुणे अशा देशातील १२ शहरात घेण्यात येते. *(तभा वृत्तसेवा)*